# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२२३ दिनांक-१२/०६/२०२४

## मित्राचा खुन करुन फरार झालेल्या आरोपीत यास राज्य हरियाना येथुन अटक करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १०/०५/२०२४ रोजी १८:०० वा.च्या सुमारास, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, मुंबई वाहिनी लगत, सोपारा फाटा, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर येथे रस्त्यावरील एका नाल्यात एक पुरुषाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळुन आला होता. सदर मृतदेहाची ओळख पटत नसल्याने बेवारस अकस्मात मृत्यु रजि. क्रमांक ६५/२०२४ सीआरपीसी १७४ अन्वये दाखल करुन तपासाची सुरवात केली.

सदर अकस्मात मृत्युचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी सदर अकस्मात मृत्यु मधील मयताची ओळख पटवुन त्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश पोलिस निरीक्षक कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री.सोपान पाटील, पोउपनि भोपळे व पथक यांना दिले होते.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कुमारगौरव धादवड, पो.नि (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनिरी/तुकाराम भोपळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाने अकस्मात मृत्युची चौकशी सुरु केली होती. सदर अकस्मात मृत्युच्या चौकशीमध्ये मयताच्या पॅन्टमध्ये एक चिठ्ठी भेटली सदर चिठ्ठीवरुन मयत हा ESEL स्टुडीओ ट्रॉम्बे मानखुर्द, नवी मुंबई येथे शुटींगचे कामा करीता जुनिअर आर्टीस्ट पुरविण्याचे काम करीत असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन मिळालेल्या माहीतीवरुन सदरचा मृतदेह हा संतोषकुमार यादव याचा असल्याची खात्री झाल्याने संतोषकुमार यादव याच्या नातेवाईकामार्फत सदर मृतदेहाची ओळख निष्पन्न झाली. संतोषकुमार यादव यांच्या शवविच्छेदन अहवालामध्ये त्याच्या मृत्युचे कारण हे "हेड इंन्जुरी" असे आल्याने पेल्हार पोलीस ठाण्याचे पोउपनि संभाजी मुंडे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने अज्ञात आरोपीत यांच्या विरोधात पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्रं.४७०/२०२१ भादविसं कलम ३०२,२०१ प्रमाणे दिनांक १३/०५/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सोपान पाटील व पोलीस पथक यांनी आरोपीत यांच्याबाबत तांत्रिक माहिती प्राप्त करुन आरोपीत यांचा तांत्रिक बाबीवर व गुप्त बातमीदार यांच्याबाबत माहिती घेऊन आरोपीत - सनी सुनिल सिंग, वय- २६ वर्षे, यास दिनांक १४/०५/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपीत सनी सुनिल सिंग याचा साथिदार राहुल सोहन पाल हा गुन्हा नोंद झाल्यापासुन फरार झाला होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत राहुल सोहन पाल यांच्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सोपान पाटील व पोलीस पथक यांनी तांत्रिक माहिती प्राप्त करुन आरोपीत यांचा तांत्रिक बाबीवर शोध घेत असतांना आरोपीत हा सेक्टर ५८, फरीदाबाद पोलीस ठाणे हद्दीत जाजरु, गावचे हद्दीत फरीदाबाद येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीत याचा शोध घेतला असता आरोपीत राहुल सोहन पाल, वय ३० वर्षे, हा जाजरु फरीदाबाद राज्य हरियाना येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हयाचे कामी दिनांक ०७/०६/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकील शेख, (पोलीस निरीक्षक प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, मिथुन मोहिते, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, अभिजीत नेवारे सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा/ नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

